| रे.मु.नं.५०३/२०२० मधील निशाणी क्र.३७ खालील आदेश (अजित शिवाजी पोटे व इतर विरुध्द योगेश बाळासाहेब पोटे व इतर) | MHAH140007302020 |
| --- | --- |

सदरचा अर्ज वादीं तर्फे उलटतपास नाही चा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादीचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. वादी यांनी सदर अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादीने निशाणी क्र. २८ सरतपासाचे शपथपत्र दाखल केले होते. परंतु, त्यावर वादींने प्रतिवादीचा उलटतपास घेतलेला नाही. त्यामुळे वादीविरुध्द उलटतपास नाही चा आदेश झाला होता. उलटतपास नाही चा आदेश रद्द न झाल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, उलटतपास घेणेची परवानगी मिळावी.

३. प्रतिवादींने सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे की, सदरचा अर्ज खरा व बरोबर नाही. प्रतिवादीने दिनांक १७.०२.२०२५ रोजी सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. वादीने त्याच दिवशी त्याची प्रत स्विकारली आहे. परंतु, त्यांनी पुर्ण कल्पना असतांना जाणिवपुर्वक प्रतिवादीचा उलटतपास घेतलेला नाही. वादींचा प्रतिवादींना त्रास देण्याचा व दावा लांबवण्याचा हेतू आहे. दावा अंतीम युक्तीवादाकामी असतांना वादीने दाव्याचे कामकाज लांबविल्याने वादीस १०,०००/– रूपये दंड करून वादीचा अर्ज नामंजूर करावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद विचारात घेतला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, प्रतिवादीचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र. २८ वर दिनांक १७.०२.२०२५ रोजी दाखल केले होते. सदर शपथपत्राची प्रत वादीने त्याच दिवशी घेतलेली होती. परंतु, पुरेशी संधी देवून देखील वादीने उलटतपास न घेतल्यामुळे दिनांक

१६.०६.२०२५ रोजी निशाणी क्र. २८ वर उलटतपास नाहीचा आदेश पारीत केला. त्यानंतर दिनांक ०४.१०.२०२५ रोजी वादीने प्रस्तुत अर्ज दाखल केला. प्रतिवादीने अर्जामध्ये कोणतेही कारण नमुद केलेले नाही.

**५.** परंतु, असे असले तरी देखील प्रस्तुत दावा हा मोजणी व कब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. दावा गुणदोषावर निकाली काढयाकरीता दोन्ही बाजुंना उलटतपासाची संधी देणे आवश्यक आहे. तसेच प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा पुर्णतः निकाल लागण्यास मदत होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायाच्यादृष्टीने योग्य ठरेल. त्याचबरोबर प्रस्तुत अर्जामुळे दाव्याच्या कामकाजास झालेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज दंडासह मंजुर करणे योग्य व रास्त ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

१. निशाणी क्र. २८ वरील उलटतपास नाही हा आदेश दंड रक्कम रुपये ५००/– (रक्कम रूपये पाचशे मात्र) आकारूण रद्द करण्यात येतो.

२. वादींनी प्रतिवादीस सदर दंडाची रक्कम पुढील तारीख किंवा तत्पूर्वी दयावी.

३. प्रतिवादीने पुढील तारखेस उलटतपासाकामी न्यायालयात हजर राहावे.

४.उभय पक्षकारांनी प्रस्तुत आदेशाची तात्काळ नोंद घ्यावी.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.10.15 17:23:35 +0530

(श्रीमती संध्या यु. सुळ)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक – १५/१०/२०२५